# विकसित भारत-विकसित महाराष्ट्र
## शाश्वत व सर्वसमावेशक विकासाची रुपरेषा

महाराष्ट्र शासनाचा २०२५-२०२६ या वर्षाचा

अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना


## श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री (वित्त)


यांनी सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ रोजी

केलेले भाषण

भाग - दुसरा

*

मा. अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग- दोन मा. सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या स्वतःच्या कर महसूलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट तीन लाख त्रेचाळीस हजार चाळीस कोटी रुपये एवढे निश्चित करण्यात आले होते.

२. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसूलाचा सुधारित अंदाज रुपये तीन लाख सदुसष्ट हजार चारशे सदुसष्ट कोटी एवढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या स्वतःच्या कर महसूलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट तीन लाख सत्याऐंशी हजार सहाशे चौऱ्याहत्तर कोटी रुपये एवढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसाठी राज्यकर विभागाची अभय योजना**

४. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबत, मी अभय योजना जाहीर करीत आहे. सदर अभय योजनेचे नाव ‘ महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ ’ असे असेल.

या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांका पासून दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत असेल.

**व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर चार चाकी सीएनजी व एलपीजी वाहनांवरील मोटार वाहन करामध्ये वाढ**

५. सध्या व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर चार चाकी सीएनजी व एलपीजी वाहनांवर वाहन प्रकार आणि किंमतीनुसार ७ ते ९ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी केली जाते. या कराच्या दरांमध्ये १ टक्क्याने वाढ प्रस्तावित करीत आहे.

सदर दरवाढीमुळे राज्यास सन २०२५-२६ मध्ये सुमारे १५० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

इलेक्ट्रिक वाहनांवरील मोटार वाहन कर

६. राज्यात रुपये ३० लाखा पेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

मोटार वाहन कराच्या कमाल मर्यादा

७. मोटार वाहन कराची कमाल मर्यादा ही २० लाख रुपयांवरुन ३० लाख रुपये असे करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

कमाल मर्यादेत प्रस्तावित वाढीमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे १७० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कर

८. बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना अनिवार्यपणे एकरकमी वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित मोटार वाहन कर सुधारणेमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे १८० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

हलक्या मालवाहतुक वाहनांवरील (एलजीव्ही) मोटार वाहन कर

९. राज्यात ७५०० किलो वजनापर्यंतच्या मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर (एलजीव्ही) अनिवार्यपणे एकरकमी वाहनांच्या किंमतीच्या ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचे प्रस्तावित करीत आहे.

प्रस्तावित मोटार वाहन कर सुधारणेमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे ६२५ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

पुरक दस्तऐवजासाठीचे मुद्रांक शुल्क

१०. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४ नुसार एकाच व्यवहाराच्या पूर्ततेसाठी एकापेक्षा जास्त दस्तऐवजांचा वापर केल्यास, पुरक दस्तऐवजांना रुपये १०० ऐवजी रुपये ५००/- इतके मुद्रांक शुल्क आकारण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अभिनिर्णय प्रकरण

११. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३१ (१) नुसार एखाद्या दस्तावर भरावयाच्या मुद्रांक शुल्काबाबत दस्त अभिनिर्णय प्रक्रियेसाठी सध्या आकारण्यात येणारे शुल्क रुपये १०० ऐवजी रुपये १००० इतके करण्याचे तसेच निष्पादित दस्त अभिनिर्णयासाठी दाखल करताना प्रथम दर्शनी देय असणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम जमा करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

ई-मुद्रांक प्रमाणपत्र

१२. नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने मुद्रांक शुल्काचा भरणा करणे व प्रमाणपत्र देणे हे सुलभ व्हावे यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम १० (३) व (४) मध्ये 'ई-मुद्रांक प्रमाणपत्राची' नवीन तरतूद लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

हा अर्थसंकल्प म्हणजे विकासचक्राला गती देण्यासाठी, संकल्पना आणि कृती यांचा घातलेला संतुलित मेळ आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्वांनी मिळून हातभार लावण्याची हीच वेळ आहे.

विकास संकल्प। विकासाचा ध्यास ।।

मनी धरु आस। विकासाची ।।

विकासचक्राला। देऊनिया गती ।।

साधुया प्रगती। वेगातची ।।

मिळोनिया सारे। राज्य विकसित ।।

राष्ट्र विकसित । करु चला ।।

राष्ट्र विकसित । करु चला ।।

राज्य विकसित । करु चला ।।

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

*********